## निशाणी ३६ वरील आदेश (नि.दि.दा.क्र.२४/२०१०)

वादी यांनी प्रस्तुत अर्ज प्रतिवादीविरुध्द तुर्तातूर्त हुकुमात्मक ताकिदीसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जातील कथनांचा सारांश पुढीलप्रमाणे–

मौजे करंदी तर्फ कुडाळ, ता. जावली, जि. सातारा येथील गट नं. ३०९ क्षेत्र ०–६९ ही मिळकत प्रस्तुत अर्जाचा विषय असून, त्यास यापुढे दावा मिळकत असे संबोधले आहे. दावा मिळकत ही वादी व सुनिलदत्त शामराव यादव यांची खरेदी मालकी हक्काची मिळकत असून, त्यात वादीचा १५ आणे व सुनिलदत्त यादव यांचा १ आणे समाईकातील हिस्सा आहे. दावा मिळकत ही गजबलेल्या ठिकाणी व भरवस्तीत आहे. सुनिलदत्त यादव यांना दावा मिळकतीत स्वारस्य नसल्याने, त्यांचा कब्जा नव्हता. संपुर्ण दावा मिळकत वादीचे कब्जेवहिवाटीत आहे. दावा मिळकतीत वादी व सुनिलदत्त यादव यांचेत सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. सुनिलदत्त यादव यांना दावा मिळकतीत स्वारस्य नसल्याने त्यांनी त्यांचे हिश्याची मिळकत तबदील करण्याचे ठरविले. त्यांचा एक आणा हिस्सा विकत घेण्याची तयारी वादीने दर्शविली. परंतू, त्यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी त्यांचा एक आणे हिस्सा बेकायदेशीर व अनाधिकाराने बक्षिसपत्र नावाच्या दस्ताने प्रतिवादी यांना स्मशानभुमी बांधण्यासाठी दिला. सदर बेकायदेशीर दस्ताचे आधारे कोणत्याही फेरफाराशिवाय दावा मिळकत प्रतिवादीचे नावे झाली. खासदार फंडातून करंदी तर्फ कुडाळ या गावासाठी पुर्वीच स्मशानभुमी होवून अंत्यविधीची सोय झाली असताना, स्वार्थी हेतूने प्रेरीत होवून वादीस त्रास देण्याच्या उद्देशाने प्रतिवादी सदर मिळकतीत स्मशानभुमी बांधणार असल्याचे त्यांनी वादींना सांगितले. दावा मिळकतीत स्मशानभुमी झाल्यास त्यांचे व त्यांचे कुटूंबाचे शारीरीक व मानसिक

स्वास्थावर विपरीत परीणाम होणार आहे. दावा मिळकत ही स्मशानभुमी बांधण्यासाठी योग्य जागा नाही. त्यामुळे वादीस दावा मिळकतीची वहिवाट सुलभपणे करता येणार नाही. सदरबाबत वादी यांनी प्रतिवादीविरुध्द तुर्तातूर्त ताकिदीसाठी अर्ज दिला आहे. प्रतिवादी यांनी जाणुनबुजून म्हणणे देण्यास विलंब केल्याने वादी यांनी दिलेल्या अर्जावर दिनांक १४.७.२०१० रोजी दावा मिळकतीत नि. ५ वरील निर्णय होईपर्यंत उभय पक्षकारांनी '' जैसे थे परीस्थीती ठेवावी '' असा आदेश झाला आहे. सदर आदेश अस्तित्वात असताना दिनांक १५.८.२०१६ रोजी प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत सिमेंटचे पोल रोवून ग्रामपंचायतीचा बोर्ड लावला व जैसे थे परीस्थिती ठेवण्याच्या आदेशाचा भंग केला. सबब, दावा मिळकतीत प्रतिवादींनी रोवलेले ८ सिमेंटचे पोल व ग्रामपंचायतीचा बोर्ड काढून दावा मिळकत पुर्ववत करुन द्यावी अशी तुर्तातूर्त हुकुमात्मक ताकिद मिळण्यासाठी वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादी यांनी नि. ४३ येथे अर्जास म्हणणे देवून प्रखर विरोध केला. प्रतिवादी कोणत्याही प्रकारचे स्मशानभुमीचे काम करीत नसून, दावा मिळकतीतील १ आणे हिस्सा सुनिलदत्त यादव यांनी बक्षिसपत्राने प्रतिवादीस दिला असल्याने सदर १ आणे क्षेत्रात वादीचा हक्क संबंध नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे हिश्यात फार पूर्वीच पोल उभे करुन ग्रामपंचायतीचा बोर्ड लावला असून, नवीन असे कसल्याही प्रकारचे कंपाऊंड अगर बांधकाम केलेले नाही. दावा मिळकतीत प्रतिवादीचा मालकीने कब्जा असल्याने प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा असे प्रतिवादीचे कथन आहे.

५. अर्ज व म्हणणे यांचे अनुषंगाने पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादी सकृतदर्शनी केस शाबीत करतात काय ? | .. नकारार्थी |
| २. सोईची बाब वादींचे बाजूने आहे काय ? | .. नकारार्थी |
| ३. मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | .. नकारार्थी |
| ४. आदेश काय ? | .. अर्ज नामंजूर करणेत आला. |

## कारणमिमांसा

६. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांचे विधिज्ञ यांनी युक्तिवाद केला की, नि. १८ येथील अर्जावर दिनांक १४.७.२०१० रोजी आदेश होवून नि. ५ चा अंतिम निकाल होईपर्यंत उभय पक्षकारांनी 'जैसे थे परीस्थिती ठेवावी ' असा आदेश झाला आहे. स्मशानभुमीचे बांधकाम करण्याचे उद्देशाने प्रतिवादी यांनी सिमेंटचे पोल व ग्रामपंचायतीचा बोर्ड उभा करुन सदर आदेशाचा भंग केला आहे. त्यामुळे दावा मिळकतीची परिस्थिती पुर्ववत होण्यासाठी प्रतिवादीला तुर्तातूर्त हुकूमात्मक ताकीद देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. वादीचे विधिज्ञ यांनी खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

1. Suresh D. Naik and another vs. Manguesh R. Wagle and another - reported in **2000(4) Mh.L.J. 157.** In the said case, the defendants had taken forcible possession of the suit property by removing the car of plaintiff therefrom and by putting a lock as well as by putting materials and keeping boxes therein. The Hon'ble Bombay High Court held that - Once the forcible possession of the respondents from the suit premises was established, they had to be put back in possession. Technicial objections to frustrate injunction which had attained finality cannot be permitted to thwart the course of justice."

2. Tanusree Basu and others vs. Ishani Prasad Basu and others reported in 2008(1)SCCR 691. In which, the Hon'ble Supreme Court held that - Rule 1 of Order 39 is not the sole repository of the power of Court to grant injunction. Section 151 of C.P.C. confers the power to grant injunction if the matter is not governed by rule 1 and

2 of Order 39. If a party takes recourse to any contrivance to disposes another during pendency of the suit either in violation of the order of injunction or otherwise, the Court indisputably will have jurisdiction to restore the parties back to the same position.

3. Harishchandra Narayan Maurya vs. Rajendra Parasad Dargahi Varme reported in 1998(11) Mah. L.R. 93. The Hon'ble Bombay High Court held that - Plaintiff if dispossesses the defendant in the garb of Courts order by use of force, the Court is empowered to order the restoration of possession of defendant.

७. प्रतिवादी यांचे विधिज्ञ यांनी युक्तिवाद केला की, दावा मिळकत प्रतिवादीनी बक्षिसपत्राने प्राप्त केली असल्याने व दावा मिळकतीचे ७/१२ सदरी प्रतिवादीची नोंद असल्याने प्रतिवादी हे दावा मिळकतीतील सहमालक आहेत. त्यामुळे दावा मिळकतीत कब्जेवहिवाट करण्याचा प्रतिवादी यांना देखील हक्क आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे हिश्याचे संरक्षण करण्याच्या हेतुने त्यांचे हिश्याच्या हद्दी निश्चित करण्याच्या हेतुने केवळ सिमेंटचे पोल रोवले असून, त्याबाबत ग्रामपंचायतीचा बोर्ड लावला आहे. दावा मिळकतीत स्मशानभुमी बांधण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याने प्रस्तुत अर्जास कारण घडलेले नाही. सिमेंट पोल व बोर्ड दावा मिळकतीत फार पुर्वीच लावला असल्याने प्रस्तुत अर्ज चालण्यास पात्र नसल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

**वादप्रश्न क्रमांक १ ते ३ करीताः–**

८. नि. ३/१ येथील बक्षिसपत्राच्या सहीशिक्याचे प्रतीचे अवलोन करता, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीतील १ आणे हिस्सा सुनिलदत्त यादव यांचेकडून बक्षिसपत्राने प्राप्त केला असल्याचे दिसून येते. सुनिलदत्त यादव हे वादीचे पुर्वीचे सहमालक होते व त्यांचा दावा मिळकतीत १ आणे हिस्सा होता याबाबत वाद नाही. सदर बक्षिसपत्राचे आधारे दावा मिळकतीस १ आणे हिश्यास प्रतिवादीचे नावाची नोंद झाल्याचे नि. ८ येथील ७/१२ उता–यावरुन स्पष्ट होते. यावरुन सद्यस्थितीत , वादी

व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सहमालक असल्याचे निष्पन्न होते. प्रस्तुत बक्षिसपत्रात दावा मिळकत ही सार्वजनिक स्मशानभुमी बांधण्यासाठी दिली असल्याचा उल्लेख आहे. नि. ५ वरील आदेशानुसार दाव्याचे अंतिम निर्णयापर्यंत दावा मिळकतीत स्मशानभुमी बांधू नये व दहनविधी करु नये अशी तुर्तातूर्त ताकिद प्रतिवादीस देण्यात आली आहे. सबब, स्मशानभुमीचे बांधकाम हा प्रस्तुत अर्जाचा विषय नाही.

९. वादी यांनी नि. ५ येथील अर्ज दिनांक ३०.४.२०१० रोजी दिला होता. तथापि, सदर अर्जावर ७ वर्षाचे विलंबाने प्रस्तुत अर्जासोबत युक्तिवाद उभय पक्षकारांनी केला आहे. नि. १८ येथील अर्जाचे अवलोकन करता, प्रतिवादी ही ग्रामपंचायत असल्याने मनुष्यबळाचे जोरावर स्मशानभुमीचे काम करण्याचे तयारीत असल्याचे वादीना समजल्याने नि. ५ चे अर्जाचा निकाल होईपर्यंत दावा मिळकतीत स्मशानभुमीचे बांधकाम करु नये अशी तुर्तातूर्त ताकिद वादीने मागितली होती. त्यावर दिनांक १४.७.२०१० रोजी आदेश होवून दावा मिळकतीबाबत उभय पक्षकारांना नि. ५ वर अंतिम आदेश होईपर्यंत 'जैसे थे परिस्थिती ठेवावी ' असा आदेश करण्यात आला होता. या ठिकाणी ही बाब नमुद करणे आवश्यक आहे की, दावा दाखल करताना तसेच नि. १८ येथील अर्ज दाखल करताना अगर नि. १८ येथील अर्जावर आदेश झाल्याचे दिवशी, वाद मिळकतीची परिस्थिती काय होती हे दर्शविणारी छायाचित्रे अगर कागदोपत्री पुरावा वादी यांनी दाखल केलेला नाही. त्यामुळे नि. १८ वरील आदेश झाला तेव्हा दावा मिळकतीची परिस्थिती कशी होती हे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्यात, सिमेंटचे पोल व ग्रामपंचायतीचा बोर्ड फार पुर्वीच उभारला असल्याचे व कोणत्याही नवीन प्रकाररचे कंपाऊंड अगर बांधकाम केले नसल्याचे कथन केले आहे. वर नमुद केल्याप्रमाणे, नि. १८ येथे आदेश झाला त्यावेळी दावा

मिळकतीची परिस्थिती काय होती हे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने नि. १८ वरील आदेश होण्यापुर्वीची व त्यानंतरची परिस्थिती यांची तुलना करण्यास कोणताही आधार अभिलेखावर नाही.

१०. नि. ३९/१ येथे वादीने २ छायाचित्रे दाखल केली असून, त्यात ठराविक अंतरावर सिमेंटचे पोल उभे केले असल्याचे व ग्रामपंचायतीचा सुचना फलक लावला असल्याचे दिसून येते. सदर सिमेंटचे पोल व बोर्ड नि. १८ वरील आदेशानंतर लावण्यात आला हे दाखविणारा प्रथमदर्शनी पुरावादेखील अभिलेखावर नाही. प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सहमालक असल्याचे व दावा मिळकतीत त्यांचा समाईकात हिस्सा असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द झालेने, सहमालक या नात्याने दावा मिळकतीत त्यांचे हिश्यात कब्जा व वहिवाट करणे हा प्रतिवादीचाही हक्क असल्याचे निष्पन्न होते. नि. ३९/१ येथील छायाचित्रावरुन सिमेंटचे पोल दिसत असून, त्यास कोणतेही तारकंपाऊंड केलेले नाही हे स्पष्ट होते. सदर छायाचित्रात दिसत असणारे फलकाचे अवलोकन करता, दावा मिळकतीतील ४ गुंठे जागा ग्रामपंचायत मालकीची असून, त्यात अतिक्रमण केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल असा मजकुर नमुद आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी सहमालक असल्याने त्यांचे १ आणे हिश्याच्या संरक्षणाकरीता सुचना फलक उभारणे व हद्द दर्शविण्यासाठी सिमेंटचे पोल उभारणे ही बाब प्रतिवादीचे हक्काची असल्याने त्यात बेकायदेशीर कृत्य केल्याचे निष्पन्न होत नाही. सदर ८ सिमेंटचे पोल व ग्रामपंचायतीचा सुचना फलक यामुळे दावा मिळकतीतील वादीचे कब्जे वहिवाटीस कोणत्या प्रकारे अडथळा निर्माण झाला आहे याचा कोणताही खुलासा प्रस्तुत अर्जात नमुद नाही व तसा अडथळा होणार असल्याचे नि. ३९/१ येथील छायाचित्रावरुन दिसून येत नाही.

प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सहमालक असल्याने त्यांनी दावा मिळकतीचे १ आणे हिश्याचा कब्जा जबरदस्तीने घेतला असल्याचे निष्पन्न होत नाही. सदर सिमेंट पोल व सुचना फलक लावून प्रतिवादीने वादीना संपुर्ण दावा मिळकतीतून हुसकावून लावले आहे अशीही वादीची केस नाही. सदर सुचना फलकात १ आणे हिस्सा म्हणणेच ४ गुंठे क्षेत्राचा उल्लेख आहे. सबब, वादीने दाखल केलेल्या वर नमुद न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती प्रस्तुत प्रकरणाशी मिळतीजुळती नसल्याने, त्यातील न्यायनिर्णय या केसला लागू होत नाही.

११. वरील विवेचनाचा आढावा घेता, प्रस्तुत अर्जाबाबत प्रथमदर्शनी केस असल्याचे व सोईची बाब वादीचे बाजुने असल्याचे वादीने सिध्द केलेले नाही. नि. ५ येथील अर्जावरील आदेशाचे पार्श्वभुमीवर प्रस्तुत अर्जास घडलेले कारण वादीने सिध्द केलेले नाही. सबब, अर्ज नामंजूर झाल्यास अपरिमित नुकसान होणार असल्याचे वादीने सिध्द केलेले नाही. सबब, वादप्रश्न क्रमांक १ ते ३ यांचे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहेत व वादप्रश्न क्र. ४ करीता, पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. नि. ३६ येथील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

(गि.म.साधले)

दिनांकः १५.१२.२०१७

दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर)मेढा.